Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

Original Article

भारतातील बँकांचा इतिहास आणि आर्थिक विकासात बँकांची भूमिका

Pathan Ashapak Jafarkhan
(Research Student)
Email- pathanashfaquekhan8888@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180744
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 7
Pp. 208-210
July- 2026
Submitted: 16 June. 2026
Revised: 26 June. 2026
Accepted: 11 July. 2026
Published: 31 July. 2026

सारांश

भारतातील बँकिंग व्यवस्थेचा इतिहास हा प्राचीन काळापासून सुरू होऊन आधुनिक काळापर्यंत पोहोचला आहे आणि विकसित झाला आहे. या संशोधनाचा उद्देश बँकिंग क्षेत्रातील विकास आणि आर्थिक प्रगतीतील बँकांची भूमिका अभ्यासणे हा आहे. या संशोधनासाठी दुय्यम माहिती स्रोतांचा वापर करण्यात आला आहे. अभ्यासातून असे दिसून येते की बँका कर्ज पुरवठा, बचत संकलन आणि वित्तीय समावेशनाच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेला सुरळीतपणे चालवण्याचा काम करतात त्यामुळे बँकिंग क्षेत्र हे भारताच्या आर्थिक विकासाचे महत्त्वाचे आधारस्तंभ मानले जाते. बँक म्हणजे अशी एक संस्था की जे ठेवी स्वीकारते आणि ठेवींचा स्वीकार करून कर्ज देत असते असे संस्थेला बँक असे म्हणतात जगामध्ये बँकिंग ची सुरुवात ही इटली या देशांमधून झालेली आहे इटली या देशातील लोम्बार्डी (lombardi) या शहरात बँकिंगची पहिल्यांदा सुरुवात झालेली आहे. बँक हा शब्द Banco किंवा Bankas या इटालियन शब्दापासून निर्माण झालेला आहे इटलीमधील सावकार लोक बेंच वर बसून कर्ज देण्याचे काम करीत होते त्या बेंचलाच बँकस असे शब्द इटालियन भाषेत आहे त्यामधूनच बँक (Bank) या शब्दाची उत्पत्ती झालेली आहे. भारतातील बँकिंग व्यवस्थेचा इतिहास प्राचीन काळापासून सुरू होत काळानुसार बँकिंग प्रणाली मध्ये मोठे बदल झाले आणि आज ती आधुनिक तंत्रज्ञानाधारित व मजबूत स्वरूपात विकसित झाली. मोरया व गुप्तकाळात सावकार व्यापारी आणि आणि शेठजी लोक कर्ज देण्याचे काम करत होते त्या काळात हुंडी पद्धती प्रचलित होती व्यापाऱ्यांसाठी पैशांची देवाणघेवाण सुरक्षित पद्धतीने होत असे. मोरया व गुप्त काळानंतर ब्रिटिश ब्रिटिश साम्राज्याचा उदय झाला. ब्रिटिश साम्राज्यामध्ये 1770 मध्ये बँक ऑफ हिंदुस्थान ही भारतातील पहिली बँक सुरू झाली (आत्ता ती अस्तित्वात नाही) यानंतर 1806 मध्ये बँक ऑफ कलकत्ता ची स्थापना करण्यात आली इथेच न थांबता ब्रिटिशांनी आणखीन काही बँकांची स्थापना केली जसे की बँक ऑफ बॉम्बे ची 1840 साली स्थापना करण्यात आली तसेच बँक ऑफ मद्रास ची 1843 साली स्थापन केली. बँक ऑफ कोलकत्ता, बँक ऑफ बॉम्बे, बँक ऑफ मद्रास यांना पुढे चालून प्रेसिडेन्सी बँक असे नाव देण्यात आले. 1921 मध्ये या तिन्ही बँकांचे विलीनीकरण करून इम्पेरियल बँक ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली.

गृहीतक

1. भारतातील बँकिंग व्यवस्था भारताच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असते.
2. बँकिंगमुळे वित्तीय समावेशन होते व दुर्बन घटकांचा आर्थिक स्थर सुधारण्यास मदत होते.
3. बँकिंगच्या कर्ज पुरवठ्यामुळे उद्योग क्षेत्र, कृषी क्षेत्र व सेवा क्षेत्र यांचा विकास होतो.
4. भारतामधील बँकिंग क्षेत्राच्या विकासाचा देशाच्या आर्थिक वृद्धीवर लक्षणीय परिणाम झालेला आहे.
5. बँकिंग क्षेत्रामध्ये झालेल्या तांत्रिक बदलाचा बँकांच्या कार्यक्षमतेवर सकारात्मक परिणाम झालेला आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
Pathan Ashapak Jafarkhan (Research Student)

How to cite this article:
Pathan A. J. (2026). भारतातील बँकांचा इतिहास आणि आर्थिक विकासात बँकांची भूमिका. Journal of Research and Development, 18(7), 208–210. https://doi.org/10.5281/zenodo.22027026

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.22027026
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

संशोधनाची उद्दिष्टे

1. भारतामधील बँकिंग व्यवस्थेच्या इतिहासाचा अभ्यास करणे.
2. प्राथमिक क्षेत्र द्वितीय क्षेत्र आणि तृतीय क्षेत्राच्या विकासात बँकांचे योगदान तपासणी.
3. भारताच्या आर्थिक विकासामध्ये बँकांची भूमिका समजून घेणे.
4. वित्तीय समावेशन वाढवण्यासाठी बँकांची काय भूमिका आहे समजून घेणे.
5. बचत संकलन आणि कर्ज पुरवठ्यातील बँकांचे योगदान अभ्यासणे.

विषय विवेचन

भारतातील बँकिंग व्यवस्थेचा इतिहास हा प्राचीन काळापासून सुरू आहे. त्या काळात महाजन, व्यापारी लोक, आणि सावकार कर्जपुरवठा करत होते त्या काळात हुंडी पद्धतीद्वारे पैशाची देवाणघेवाण सुरक्षित पद्धतीने केली जायची जेव्हा भारतावर ब्रिटिशांचा साम्राज्य निर्माण झालं तेव्हापासून आधुनिक बँकिंग ची सुरुवात झाली 1770 मध्ये बँक ऑफ हिंदुस्थान ही भारतातील पहिली बँक स्थापन करण्यात आली. बँक ऑफ हिंदुस्थान नंतर प्रेसिडेन्सी बँका (बँक ऑफ कलकत्ता, बँक ऑफ बॉम्बे, बँक ऑफ मद्रास,) यांची स्थापना करण्यात आली. त्यानंतर 1921 मध्ये प्रेसिडेन्सी बँक यांची विलीनीकरण करून इम्पेरियल बँक ऑफ इंडिया तयार करण्यात आली जी पुढे चालून 1955 मध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया म्हणून विकसित झाली. भारत 1947 रोजी स्वातंत्र्य झाला स्वातंत्र्यानंतर भारतात बँकिंग क्षेत्रात अनेक मोठे बदल झाले जसे की 1969 आणि 1980 मध्ये बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले ज्यामुळे बँकिंग सेवा ही ग्रामीण भागात दुर्बल घटकांपर्यंत पोहोचायला सुरुवात झाली. तसेच 1991 नंतरच्या आर्थिक उदारीकरणामुळे खाजगी आणि विदेशी बँकांचा सहभाग भारतामध्ये वाढला व त्यामुळे बँकिंग क्षेत्र हे अधिक स्पर्धात्मक व तंत्रज्ञानाधारित बनले.आर्थिक विकास म्हणजे केवळ राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ नव्हे तर उत्पन्न, रोजगार, उत्पादन, जीवनमान, शिक्षण, आरोग्य या सर्व घटकांमध्ये होणारी सर्वांगीण सुधारणा किंवा सकारात्मक बदल म्हणजे आर्थिक विकास होय. बँक ह्या भांडवलनिर्मितीत चालना देत असतात जसे आर्थिक विकासात बँका खूप महत्त्वाची भूमिका बजावतात म्हणजेच बँक आहे अनेक खातेदारकांकडून ठेवी स्वीकारतात व त्या ठेवी जमा करून कर्ज देतात म्हणजेच बँक आहे ठेवीमधून कर्ज निर्माण करतात व उद्योगपतींसाठी किंवा व्यवसायिकांसाठी भांडवल निर्मिती चालना देत असतात. बँका ह्या बचतीची संकलन करण्याचेही काम करतात जसे आर्थिक विकासात बँक ह्या लोकांकडे अल्प रक्कम जमा करते व त्या रकमेचा वापर करून कर्ज देण्याचे काम करीत असते लोकांच्या बचती हा सांभाळून ठेवण्याचे काम बँका करीत असतात यातून लोकांना बचतीची सवय लागते. औद्योगिक विकासात चालना देण्याचे काम बँका करीत असतात म्हणजे उद्योगधंदे उभारण्यासाठी भांडवलाची गरज भासते तेव्हा बँका भांडवल उपलब्ध करून देण्याचे काम करीत असतात बँक ह्या लोकांच्या ठेवी स्वीकारतात व त्या ठेवीचा वापर उद्योग धंद्यांना कर्ज म्हणून देत असतात अशा प्रकारे बँका ह्या औद्योगिक विकासात चालना देऊन आर्थिक विकास कार्याचे काम करीत असतात. कृषी विकासामध्ये ही बँक आहे महत्त्वाची भूमिका बजावतात म्हणजेच बँक ह्या शेतकऱ्यांना वेगवेगळ्या प्रकारचे कर्ज देण्याचे काम करीत असतात उदाहरणार्थ पीक कर्ज, सिंचन कर्ज, किंवा कृषी यांत्रिकीकरणासाठी वित्तपुरवठा असे अनेक प्रकारे बँका ह्या शेतकऱ्यांना कर्ज देण्याचे काम करीत असतात ह्या कर्जामधून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते या कर्जासोबतच पीक विमा करण्याचे काम ही बँका करीत असतात. कोणत्याही देशाचा विकास हा त्या देशातील काम करणाऱ्या लोकांवर अवलंबून असतो रोजगार वाढीसाठी उद्योग व सेवा क्षेत्रातील गुंतवणूक ही महत्त्वाची ठरते जेव्हा बँक उद्योगपतींना कर्ज देतात तेव्हा उद्योगपती हे उद्योग उभे करतात व ह्या उद्योगांमध्ये रोजगार निर्माण होत असते अशा प्रकारे बँका रोजगार निर्मिती करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडतात. आर्थिक विकासात बँका ह्या डिजिटल आणि आधुनिक अर्थव्यवस्थेला पाठबळ देण्याचे काम करीत असतात उदाहरणार्थ RTGS (REAL TIME GROSS SETTLEMENT), NEFT(NATIONAL ELECTRONIC FUND TRANSFER), कॅशलेस सेवा व तसेच पारदर्शकता वेगवान व्यवहार करण्यामध्ये बँका ह्या महत्त्वाची भूमिका बजावत असतात कॅशलेस व्यवहारामुळे अर्थव्यवस्थेत खूप मोठ्या प्रमाणावर पतनिर्मिती होत असते व याच्यातून देशाचा आर्थिक विकास होत असतो. विषय विवेचनावरून असे स्पष्ट होते की, भारताने केवळ बँकांचे जाळेच विस्तारले नाही, तर बँकिंगला तंत्रज्ञानाची जोड देऊन ते सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवले आहे. 'विकसित भारत @२०४७' कडे वाटचाल करताना बँकिंग क्षेत्र हे शाश्वत विकासाचा सर्वात मोठा आधार असेल.

निष्कर्ष

भारतातील बँकांचा इतिहास आणि देशाच्या आर्थिक विकासातील त्यांची भूमिका यांचा सविस्तर अभ्यास केल्यानंतर खालील महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढता येतात.

1. भारतामध्ये 1969 आणि 1980 मध्ये प्रामुख्याने व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले गेले ह्या राष्ट्रीयकरणामुळे बँकेच्या सेवा सुविधा ह्या देशातील ग्रामीण व दुर्गम भागामध्ये पोहोचवण्यास खूप मदत झाली तसेच कृषी लघुउद्योग ग्रामीण व्यवसाय आणि इतर दुर्बल घटकांना संस्थात्मक कर्ज उपलब्ध होण्यास चालना मिळाली.
2. बँका ह्या ठेवीतून कर्ज आणि परत कर्जातून ठेवी निर्माण करण्याचा कार्य करीत असतात याच्यामुळे प्रचंड प्रमाणात पत निर्मिती होत असते. पत निर्मिती झाल्यामुळे उद्योग, व्यापार, सेवा, कृषी आणि पायाभूत सुविधा यांसारख्या क्षेत्रांना वित्तपुरवठा केला जातो अशा प्रकारचा वित्त पुरवठा केल्याने उत्पादन क्षमता वाढण्यास आणि आर्थिक व्यवहार वाढण्यास चालना मिळत असते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

3. अनेक बँकांच्या समावेशनामुळे (राष्ट्रीयकरण) आणि बँकिंग व्यवस्थेच्या विस्तारामुळे समाजातील ग्रामीण,आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकांना वित्तीय व्यवस्थेशी जोडण्यास मदत झाली आहे तसेच जनधन खाती,थेट लाभ हस्तांतरण आणि विविध डिजिटल बँकिंग सेवांमुळे खूप मोठ्या प्रमाणावर वित्तीय समावेशन होत आहे.
4. बँकिंग व्यवस्थेच्या विकासामुळे उद्योग, व्यापार, सेवा, आणि स्वयंरोजगारासाठी कर्ज उपलब्ध झाले आहेत आणि नवीन आर्थिक उपक्रमांची निर्मितीही होत आहे परिणामी प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होताना दिसत आहे.
5. आधुनिक बँकिंग व्यवस्था ही अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ ठरत आहे पारंपारिक ठेवी आणि कर्ज पुरवठ्यापासून सुरुवात झालेली भारतीय बँकिंग व्यवस्था आज पूर्णपणे तंत्रज्ञानावर आधारित आहे आणि सगळे आर्थिक व्यवहार हे डिजिटल प्लॅटफॉर्मचा (Phonepay, Google pay, Paytm) वापर करून करण्यात येत आहे त्यामुळे आधुनिक अर्थव्यवस्थेच्या कार्यक्षमतेत बँकिंग क्षेत्राची भूमिका अधिक महत्त्वाची झालेली आहे.
6. बँका ह्या अनेक क्षेत्रांना वित्तपुरवठा करीत असतात जसे की शिक्षण, आरोग्य, गृहनिर्माण, वाहतूक, पर्यटन, व्यापार आणि इतर सेवा क्षेत्रांना वित्त पुरवठा करण्याचे काम हे बँकिंग क्षेत्र करीत असते त्यामुळे सेवा क्षेत्राचा विस्तार आणि अर्थव्यवस्थेतील त्याचा वाटा वाढण्यास मदत होते.

संदर्भसूची

1. एम. एल. धिंगा (M. L. Dhingra) – 'भारताची अर्थव्यवस्था' (The Indian Economy), एस. चंद पब्लिकेशन, नवी दिल्ली.
2. डॉ. प्रकाश वैरागडे – 'आधुनिक बँकिंग आणि वित्तीय प्रणाली', पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.
3. डॉ. सी. बी. मामोरिया, डॉ. सुतीक्षण कुमार – 'भारतीय बँकिंग प्रणाली' (Indian Banking System), साहित्य भवन पब्लिकेशन, आग्रा.
4. मिश्रा, एस. के., & पुरी, व्ही. के. (विविध आवृत्त्या). Indian Economy. मुंबई: Himalaya Publishing House.
5. दत्त, आर. सी., & सुंदरम, के. पी. एम. (विविध आवृत्त्या). Indian Economy. नवी दिल्ली: 5. Chand Publishing.
6. घोष, बी. एन. (विविध आवृत्त्या). Banking in India. नवी दिल्ली: संबंधित प्रकाशन.
7. Reserve Bank of India. (Various years). Handbook of Statistics on the Indian Economy. Mumbai: Reserve Bank of India.
8. Government of India. (Various years). Economic Survey. New Delhi: Ministry of Finance.
9. Government of India. (Various years). Economic Survey of India. New Delhi: Ministry of Finance.